International Year of Cooperatives
Cooperatives Build a Better World

महाराष्ट्र शासन
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**
दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/पिग्मी एजंट/कमिशन/८३८/२०२६ दिनांक :- ३० मार्च, २०२६

## परिपत्रकीय सुचना

**विषय :- सुधारीत आदर्श उपविधीतील नियम क्र.८(ब) मधील अल्पबचत प्रतिनिधीचे कमिशनबाबत**

संदर्भ :- या कार्यालयाचे नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठीचे सुधारीत आदर्श उपविधी दि.२९/०७/२०२५

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

सहकार आयुक्त कार्यालयाने निर्गमित केलेल्या नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठीच्या सुधारीत आदर्श उपविधीतील नियम क्र.८(ब) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**८-ब दैनिक बचत प्रतिनिधी (पिग्मी एंजट) :-**

"पिग्मी एजंट याच्यामार्फत गोळा करण्यात येणाऱ्या ठेवी संदर्भात त्यांना देय कमिशन २.५% पेक्षा अधिक असणार नाही. तसेच पिग्मी एजंट याच्यामार्फत कर्ज वितरण, कर्ज वसूली अथवा अन्य व्यवसाय करता येतील. तथापि, त्यासाठी कोणतेही कमिशन देय असणार नाही."

यापूर्वी राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांमध्ये दैनिक बचत प्रतिनिधींना द्यावयाचे कमिशनबाबतचे दर ठरविण्याचा अधिकार संस्थास्तरावर देण्यात आला होता.

नियामक मंडळाने ठेवीवरील व्याज दर जास्तीत जास्त १०% एवढे निश्चित केले आहेत. तसेच नियामक मंडळाचे दि.१०/०५/२०१९ चे परिपत्रकान्वये आस्थापना व प्रशासकीय खर्च हा संस्थेच्या खेळते भांडवलाच्या २% पेक्षा अधिक असणार नाही, असे निश्चित केलेले आहे. दैनिक बचत प्रतिनिधींना द्यावयाच्या कमिशनचा समावेश प्रशासकीय खर्चामध्ये होतो. सबब पिग्मी एजंट यांना २.५% पेक्षा जास्त कमिशन देणे संस्थेच्या आर्थिक स्थितीचे दृष्टीने हितावह नाही.

याबाबत सहकार आयुक्त कार्यालयाने नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठीच्या सुधारीत आदर्श उपविधीमध्ये 'पिग्मी एजंट याच्यामार्फत गोळा करण्यात येणाऱ्या ठेवी संदर्भात त्यांना देय कमिशन २.५% पेक्षा अधिक असणार नाही.' अशी तरतूद केली असून, सहकार आयुक्तालयाचे दि.२९/०७/२०२५ चे पत्रान्वये सदर सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणेबाबत राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना व क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत.

त्यामुळे सद्यस्थितीमध्ये ज्या पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारले आहेत, त्या पतसंस्थांच्या दैनिक बचत प्रतिनिधींना २.५% कमिशन देय आहे. तसेच ज्या पतसंस्थांनी अद्याप सुधारीत आदर्श उपविधी स्विकारलेले नाहीत, त्या पतसंस्थांच्या दैनिक बचत प्रतिनिधींसाठी कमिशनचा दर जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे कामकाजामध्ये एकसुत्रीपणा असणे आवश्यक असल्याने, ज्या पतसंस्थांनी अद्याप सुधारीत आदर्श उपविधी स्विकारलेले नाहीत, त्या पतसंस्थांच्या दैनिक बचत प्रतिनिधींसाठी कमिशनचा दर जास्त आणि ज्या पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारले आहेत, त्या पतसंस्थांच्या दैनिक बचत प्रतिनिधीसाठी कमिशनचा दर २.५%, हे उचित होणार नाही.

त्यानुसार राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी निर्देश देण्यात येतात की, सहकार आयुक्तालयाचे दि.२९/०७/२०२५ चे पत्रानुसार राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारले असो किंवा नसो, "पिग्मी एजंट याच्यामार्फत गोळा करण्यात येणाऱ्या ठेवी संदर्भात त्यांना देय कमिशन २.५% पेक्षा अधिक असणार नाही. तसेच पिग्मी एजंट याच्यामार्फत कर्ज वितरण, कर्ज वसूली अथवा अन्य व्यवसाय करता येतील. तथापि, त्यासाठी कोणतेही कमिशन देय असणार नाही."

या विषयावरील पूर्वीच्या सर्व सूचना अधिक्रमित करण्यात आल्या असून, त्या आधारे सुरू असलेली कोणतीही प्रशासकीय वा कायदेशीर कार्यवाही जुन्या तरतुदींनुसारच सुरू राहील.

Tawao

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

सदर परिपत्रकीय सुचना आपले कार्यक्षेत्रात मुख्यालय असलेल्या सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना देण्यात याव्यात.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व पतसंस्था फेडरेशन) (राज्य/विभाग/ जिल्हा/ तालुके)